**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०४/२०२५**

**नि.१ वरील आदेश**

**( कृष्णा आंगणे वि. मधुसूदन आंगणे व.४)**

अर्ज वाचुन पाहिला. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील तरतुदीनुसार वारसा दाखला (Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे मते, अर्जदार हे गाव मौजे भडगांव खुर्द येथील कायम रहिवाशी असून त्यांची गाव मौजे भडगांव खुर्द येथे एकत्र कुटुंबाची मिळकत आहेत. सदर मिळकती हया अर्जदार व सामनेवाला क्र.१ ते ४ यांचे मयत वडील वासुदेव आंगणे यांच्या नावे होत्या. परंतु वासुदेव हे सन १२.०८.२०२५ साली मयत झाले. सदर मयत वासुदेव यांना मुलगा मयत मधुसूदन, अर्जदार कृष्णा व तीन मुली अनुक्रमे लक्ष्मी मधुकर पाताडे, प्रभावती विजय परब व सुषमा रमेश जाधव असे वारस असताना सदर वासुदेव आंगणे यांचे निधनानंतर त्यांचे वारस म्हणून एकमेव वारसदार अशा आशयाचा अर्ज सादर करून मयत मधुसुदन यांना एकटयाच्या नावाची गाव दप्तरी नोंद करून घेतली त्यामुळे अर्जदार व अन्य सामनेवाले क्र. २ ते ४ यांची मयताचे वारस म्हणून नोंद होणे राहून गेले.

३. अर्जदार पुढे असे कथन करतात की, दरम्यानच्या काळात अर्जदार हे कामानिमित्त मुंबई/पूणे येथे असल्याने त्यांनी वडीलांच्या मृत्यूपश्चात झालेल्या वारस तपासाकडे पाहिले नाही. अर्जदार व सामनेवाला यांची आई म्हणजेच सत्यवती वासूदेव आंगणे हिचे ०५.१०.२०१८ रोजी निधन झाले असता अर्जदार यांनी आईचे पश्चात वारसदार म्हणून सामनेवाला क्र.१ ते ४ सोबत लावण्याकरिता अर्ज सादर केला असता अर्जदार यास सामनेवाला क्र.१ यांच्या नावाची व त्यांचे पश्चात वारस म्हणून त्यांचे मुलांच्या नावाची नोंद झाल्याचे समजले तर अन्य सामनेवाला क्र.२ ते ४ यांची ही वारसदार म्हणून नोंद राहिल्याचे समजले. तलाठी सजा कुपवडे यांनी अर्जदार यांना न्यायालयाकडून

मयत वासुदेव यांचे वारसदार आहात असा दाखला आणल्यास नावाची नोंद करणे शक्य होईल न पेक्षा वारस म्हणून नावाची नोंद करू शकणार नाही असे सांगितले. म्हणून अर्जदार यांना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत जाहीर नोटीस दि.११/०२/२०२५ रोजी 'दैनिक सकाळ' सिंधुदुर्ग आवृत्ती मध्ये प्रसिध्द करण्यात आली. त्याची प्रत नि.१४ वर दाखल आहे. तसेच हा जाहीरनामा या न्यायालयाच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, तहसिलदार कार्यालय, कुडाळ यांचे नोटीस बोर्डवर, ग्रामपंचायत कार्यालय कुपवडे व ग्रामपंचायत कार्यालय भडगांव यांच्या नोटीस बार्डवर चिकटवून प्रसिध्द करणेत आली.

५. अर्जदारने त्यांच्या अर्जातील मागणीच्या पृष्टयर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर दाखल केले असून अर्जातील कथनांचा पु:नरूच्चार केलेला आहे. अर्जदार यांनी निशाणी १५ लगत त्यांना अन्य कोणताही तोंडी किंवा लेखी पुरावा दयावयाचा नाही अशी पुरशिस दिलेली आहे. तसेच नि.४/१ लगत मयत कै.वासुदेव बाबु आंगणे यांचा दाखला, नि.४/२ लगत मयत वासुदेव यांचे पश्चात वारस तपासाचा फेरफार नं.३२४ चा फेरफार उतारा, नि.४/३ लगत मधुसूदन यांचा मृत्यूचा दाखला, नि.४/३अ लगत मधुसूदन मयत झाल्याचा वारस दाखला, नि.४/४ लगत मधुसूदन मयत झाल्यानंतर झालेला वारस तपासाचा फेरफार, नि.४/५ लगत श्रीम. सत्यवती वासुदेव आंगणे मयत झाल्याचा दाखला, नि.४/६ लगत ग्रामपंचायत (ग्रुप) भडगांव सरपंच असलेबाबत दिलेला सरपंच दाखला, नि.४/७ पोलीस पाटील भडगांव यांनी मयत वासुदेव आंगणे यांचे वारस असल्याचा दिलेला दाखला व नि.४/८ लगत ८अ चा उतारा अशी कागदपत्रके हजर केलेली आहे.

६. अभिलेखावरील दाखल पुरावा पाहता मयत कै.वासुदेव बाबू आंगणे यांचा मृत्यू झाला

हे स्पष्ट होते. अर्जदारच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही आणि त्यांचा पुरावा विनाआव्हानात्मक राहिलेला आहे. तसेच सामनेवाला क्र. १ ते ७ यांनी नि.१० लगत म्हणणे देवून अर्जदार यांचा अर्ज त्यांना मान्य व कबूल आहे अर्जदार हे सामनेवाले क्र.१ ते ४ यांचे काका असून ५ ते ७ यांचे सख्खे भाऊ आहेत. तसेच त्यांनी अर्जदार यांना वारस दाखल देण्यास त्यांची कोणतीच हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. अर्जदार यांनी ते मयत कै.वासुदेव बाबू आंगणे यांचे कायदेशीर वारस असल्याचे न्यायालयासमोर शपथेवर सांगितले आहे. अर्जदार यांनी या न्यायालयासमक्ष शपथेवर केलेली कथने विनाआव्हानित आहेत. त्यामुळे अर्जदारच्या अर्जात तथ्य असलेमुळे त्याची मागणी मंजूर होणेस पात्र असल्याचे दिसून येत आहे. सबब, न्यायाचे कारणास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-::- **आदेश** -::-

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. अर्जदार कृष्णा वासूदेव आंगणे, सामनेवाला क्र.१अ प्रशांत मधुसूदन आंगणे सामनेवाला क्र.२ब श्रीम.समिक्षा सुधीर मराळ पूर्वाश्रमीची अर्चना मधुसुदन आंगणे, सामनेवाला क्र.३क श्रीम. मेघना रणजित मंडळ पूर्वाश्रमीची मेघना मधुसुदन आंगणे, सामनेवाला क्र.४ड श्रीम.मानसी प्रमोद माने पूर्वाश्रमीची रंजना मधुसुदन आंगणे, सामनेवाला क्र.२ श्रीम.लक्ष्मी मधुकर पाताडे पूर्वाश्रमीची मीरा वासुदेव आंगणे, सामनेवाला क्र.३ श्रीम.प्रभावती विजय परब पूर्वाश्रमीची हिरा वासुदेव आंगणे, सामनेवाला क्र.४ सुषमा रमेश जाधव पूर्वाश्रमीची तुळसा वासुदेव आंगणे हे मयत कै.वासुदेव बाबू आंगणे यांचे सरळ व कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) योग्य त्या कोर्ट फि स्टँम्पवर देण्यात यावे.

सही/-

दि.२०.०३.२०२६.

[जी.ए.कुलकर्णी ]

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.